# महाराष्ट्र शासन
# शिक्षण विभाग (प्राथमिक) जिल्हा परिषद, सोलापूर
## जाहिर ई-निविदा सूचना

शिक्षण विभाग (प्राथमिक), जिल्हा परिषद, सोलापूर यांचेमार्फत सोबतच्या तपशिलात नमूद केल्याप्रमाणे जिल्हा वार्षिक योजना (सर्वसाधारण) सन २०२३-२४ आदर्श शाळांमध्ये पायाभूत सुविधा निर्माण करणे या योजनेअंतर्गत प्राथमिक शाळांतील विद्यार्थ्यांची संपादणूक पातळीत वाढ होण्याच्या दृष्टीने सोलापूर जिल्ह्यातील जिल्हा परिषदेच्या एकुण ९ आदर्श शाळांमध्ये Science Technology & Innovation Center ची उभारणी करण्यासाठी इच्छूक उत्पादक / अधिकृत पुरवठादार यांच्याकडून ई-निविदेद्वारे निविदा मागविण्यात येत आहे.

| अ.क्र. | तपशिल | निविदेची एकूण रक्कम | कोऱ्या निविदा अर्जाची किंमत | बयाना रक्कम किंमत |
|---|---|---|---|---|
| १ | सोलापूर जिल्ह्यातील जिल्हा परिषदेच्या एकुण ९ आदर्श शाळांमध्ये Science Technology & Innovation Center ची उभारणी करणे | १,१०,००,०००/- | २५,०००/- | १,१०,०००/- |

१) सदर ई-निविदा प्रक्रिया संपूर्णत: ऑनलाईन प्रक्रियेद्वारे राबविण्यात येत आहे.

२) निविदेचे वेळापत्रक, तपशिल, साहित्यांचे वर्णन, धनाकर्ष, फी इत्यादी बाबी पाहण्यासाठी कृपया www.mahatenders.gov.in या संकेतस्थळास भेट द्यावी.

३) निविदा दिनांक १६/७/२०२४ रोजी सकाळी ११.०० वाजेपासून दिनांक ३०/७ /२०२४ रोजी सायंकाळी ५.३० वाजेपर्यंत www.mahatenders.gov.in या संकेतस्थळावर ऑनलाईन डाऊनलोड व सबमिशन करता येईल.

४) सदर ई-निविदेचा तांत्रिक लिफाफा दिनांक ३१/७ /२०२४ रोजी दुपारी ३.०० वाजता निविदाधारकांच्या प्रतिनिधींसमक्ष उघडण्यात येईल. निविदा त्याच दिवशी उघडता न आल्यास इतर सोयींच्या दिवशी उघडण्याबाबत संबंधित निविदाधारकांना कळविण्यात येईल.

५) निविदाधारकांना Science Technology & Innovation Center ची उभारणी दर ऑनलाईनरित्या निविदेसोबत दिलेल्या BOQ फाईलमध्ये भरून अपलोड करणे आवश्यक आहे.

मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद, सोलापूर

Scanned with OKEN Scanner

## जाहिर ई-निविदेच्या अटी व शर्ती

शिक्षण विभाग (प्राथमिक) जिल्हा परिषद, सोलापूर यांच्या अंतर्गत येणाऱ्या जिल्हा परिषदांच्या प्राथमिक शाळांतील विद्यार्थ्यांसाठी Science Technology & Innovation Center उभारणी करून देण्यासाठी जाहिर ई-निविदा मागविण्यात येत आहे.

१) सोलापूर जिल्ह्यातील ९ आदर्श जिल्हा परिषदांच्या प्राथमिक शाळांमध्ये Science Technology & Innovation Center उभारणी करून देण्यासाठीची संपूर्ण ई-निविदा प्रक्रिया ऑनलाईन पद्धतीने महाराष्ट्र शासनाच्या अधिकृत www.mahatenders.gov.in या वेबसाईटवर राबविण्यात येत आहे.

२) ई-निविदे संदर्भात सूचना/शुद्धीपत्रके ऑनलाईन पद्धतीने शासनाच्या वरील अधिकृत वेबसाईटवर राबविण्यात येईल.

३) इच्छुक निविदाधारकांनी सदर ई-निविदेमध्ये सहभागी होण्यासाठी वरील वेबसाईटवर दिलेल्या सूचनांचे पालन करणे आवश्यक आहे.

४) सदर जाहिर ई-निविदा दिनांक १६ / ७ /२०२४ रोजी वेळ सकाळी ११.०० वाजेपासून दिनांक ३०/ ७/२०२४ रोजी वेळ - ५.३० वाजेपर्यंत ऑनलाईनरित्या डाऊनलोड व सबमिशन करता येईल.

५) सदर निविदेमध्ये सहभागी होण्यासाठी इच्छुक निविदाधारकांना निविदा फॉर्म फी रूपये २५,०००/-व निविदा बयाना रक्कम रूपये १,१०,०००/- ई-टेंडरिंग पोर्टलद्वारे Online पध्दतीने भरणा करणे आवश्यक आहे. तसेच नमुना तपासणी फी रूपये ५०,०००/- चा धनाकर्ष मुख्य लेखा व वित्त अधिकारी, जिल्हा परिषद सोलापूर यांचे नांवे सोलापूर येथे वटविला जाणारा राष्ट्रीयकृत बँकेचा धनाकर्ष शिक्षण विभाग (प्राथमिक), जिल्हा परिषद सोलापूर येथे दिनांक ३० / ७ /२०२४ रोजी दुपारी ३.०० वाजेपर्यंत जमा करणे अनिवार्य आहे.

६) निविदाधारकांनी निविदेमध्ये परिशिष्ट-१ मध्ये दिलेल्या विनिर्देशाप्रमाणे Science Technology & Innovation Center उभारणी करण्यासाठी साहित्याचा प्रत्येकी एक नमुना दिनांक ३० / ७ /२०२४ रोजी दुपारी ३.०० वाजेपर्यंत शिक्षण विभाग (प्राथमिक), जिल्हा परिषद, सोलापूर येथे जमा करणे अनिवार्य आहे. सदर नमुनामध्ये परिशिष्ट-अ मध्ये नमुद केलेल्या प्रत्येक वस्तूचा समावेश असणे आवश्यक आहे. तसेच सदर परिशिष्ट-अ मध्ये नमुद साहित्यांतील किमान २५० ॲक्टीव्हीटीजवर आधारित मराठी भाषेतील Conceptual Training Videos देखील पेनड्राईव्हमध्ये सादर करणे अनिवार्य आहे. सदर बाब ही निविदाधारकांच्या तांत्रिक अर्हतेशी निगडीत असून ज्या निविदाधारकांचे नमुने तांत्रिक तपासणीमध्ये पात्र असतील अशाच निविदाधारकांचे व्यापारी लिफाफे उघडण्यात येतील.

७) निविदा प्रपत्रात खाडाखोड करू नये. निविदेतील स्पेसिफीकेशननुसारच Science Technology & Innovation Center साहित्याचा पुरवठा करणे निविदाधारकावर बंधनकारक आहे.

८) निविदाधारकांनी वरील प्रमाणे बाबी विहित वेळेमध्ये सादर न केल्यास त्यांची निविदा अवैध ठरविण्यात येईल.

९) निविदेचा तांत्रिक लिफाफा दिनांक ३१ / ७ /२०२४ रोजी दुपारी ३.०० वाजता उघडण्यात येईल. तसेच शक्य झाल्यास दिनांक १ / ८/२०२४ रोजी दुपारी ३.०० वाजता निविदेचा व्यापारी लिफाफा उघडण्यात येईल.

१०) निविदा कोणतीही पूर्व सूचना न देता रद्द करण्याचे अथवा निवेदेतील अटी व शर्ती शिथिल करण्याचे सर्व अधिकार मा.मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, सोलापूर यांनी राखून ठेवलेले आहेत.

११) ज्या निविदाधारकाची निविदा मंजूर होईल अशा निविदाधारकास या कार्यालयाकडून पुरवठा आदेश देण्यात येईल.

१२) ज्या निविदाधारकाची निविदा मंजूर होईल अशा निविदाधारकास पुरवठा आदेश दिल्यापासून १० दिवसांचे आत पुरवठा आदेशाच्या ३ टक्के इतक्या रकमेंची बँक गॅरंटी/धनाकर्ष सुरक्षा ठेव जिल्हा परिषदेकडे जमा करून शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, सोलापूर यांच्यासोबत रूपये ११,०००/- च्या स्टॅम्पपेपरवर करारनामा करून देणे बंधनकारक असेल. निविदाधारकाने यशस्वीरित्या पुरवठा केल्यानंतर १ वर्षानंतर सदर सुरक्षा ठेव रक्कम निविदाधारकास परत करण्यात येईल.

१३) उपलब्ध तरतुदीचे आधिन राहूनच साहित्यांचे पुरवठा आदेश देण्यात येतील. निविदा सूचनेतील नमुद परिमाण संख्येत वाढ / घट होण्याची शक्यता आहे.

१४) शिक्षण विभाग (प्राथमिक), जिल्हा परिषद, सोलापूर यांच्यातर्फे पुरवठाधारकास शाळेमधील किमान ५०० स्केअर फुट आकाराची आरसीसी स्लॅब व विज जोडणी असलेली वर्ग खोली Science Technology & Innovation Center उभारणीसाठी उपलब्ध करुन देण्यात येईल.

१५) अशा वर्ग खोलीमध्ये पुरवठादाराने पुरवठा आदेश प्राप्त झाल्यानंतर ६० दिवसांचे आत स्वखर्चाने निविदेतील विनिर्देशाप्रमाणे Science Technology & Innovation Center ची उभारणी करणे बंधनकारक राहील. सदर वर्ग

Scanned with OKEN Scanner

खोलीमध्ये Science Technology & Innovation Center मध्ये सोबत जोडलेल्या विनिर्देशानुसार वस्तुंचा पुरवठा करणे आवश्यक असून वस्तूंची उभारणी करुन देणे पुरवठाधारकास बंधनकारक राहील.

१६) निविदाधारकास सदर उभारणी केलेल्या Science Technology & Innovation Center बाबत संबंधित शाळेतील गणित व विज्ञान विषयाच्या शिक्षकांना प्रशिक्षण देणे बंधनकारक राहील.

१७) प्रत्यक्ष शाळांना Science Technology & Innovation Center साहित्य पुरवठा करते वेळेस साहित्यांचा वापर व हाताळणीसाठी माहिती पुस्तिका उपलब्ध करुन देणे बंधनकारक राहील. Science Technology & Innovation Center उभारणी करण्यात आलेल्या साहित्यांसाठी किमान एक वर्षाची उत्पादक वॉरंटी देणे बंधनकारक राहील, असे रु.१००/-च्या स्टॅम्प पेपरवर बंधपत्र (वॉरंटी पत्र) सादर करणे आवश्यक राहील.

१८) साहित्याचा पुरवठा केल्यानंतर निविदाधारकाने शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, सोलापूर यांचेकडे शाळा स्तरावर पुरवठा केल्याच्या पोहोच पावतीसह देयक सादर करणे आवश्यक आहे. सदर पुरवठा झाल्याची खात्री करून देयकानुसार ९० टक्के रक्कम धनादेश/आरटीजीएस द्वारे निविदाधारकास अदा करण्यात येईल. उर्वरित १० टक्के रक्कम त्रयस्थ शासनमान्य तपासणी संस्थेकडून पुरवठा केलेल्या साहित्यांची तपासणी करून त्याचा अनुकूल अहवाल प्राप्त झाल्यानंतर निविदाधारकास अदा करण्यात येईल.

१९) मुदतीत पुरवठा न केल्यास विहित नियमानुसार पुरवठा न केलेल्या मालाच्या किंमतीवर प्रती आठवडा ०.५% प्रमाणे दंडाची रक्कम देयकातून वसुल करण्यात येईल.

२०) राज्य शासन व केंद्र शासनास किंवा जिल्हा परिषदेशी संबंधीत असणाऱ्या व्यक्तीस निविदा प्रक्रियेत भाग घेता येणार नाही.

२१) कोणतीही सशर्त निविदा स्विकारली जाणार नाही / विचारात घेतली जाणार नाही.

२२) उद्योग उर्जा व कामगार विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे शासन निर्णय क्र.भाखस-२०१४/प्र.क्र.८२/भाग-३/उद्योग-४ दि.१/१२/२०१६ मध्ये नमूद सर्व अटी व शर्ती पुरवठादारास बंधनकारक राहतील.

२३) निविदाधारकाच्या प्राधिकृत प्रतिनिधीने निविदेच्या सर्व कागदपत्रांवर सिल, स्वाक्षरी करून नोटरीमार्फत सर्व कागदपत्रे साक्षांकित करून ऑनलाईनरित्या अपलोड करणे आवश्यक आहे.

२४) निविदेतील मंजूर दर हे शासन नियमानुसार पुरवठा आदेश निर्गमित केल्याच्या तारखेपासून १८० दिवस ग्राह्य राहतील. त्यानुसार यापुढे उपलब्ध होणाऱ्या तरतुदीनुसार पुरवठा आदेश देण्यात येतील. यशस्वी पुरवठाधारकास त्याच दराने पुरवठा करणे बंधनकारक असून मंजूर दरास कोणतीही भाववाढ देण्यात येणार नाही.

२५) निविदेबाबत कोणतीही शंका / प्रश्न असल्यास निविदा भरण्याच्या तारखेच्या किमान ३ दिवस आगोदर लेखी स्वरूपात विचारल्यास शंका निरसन करण्यात येईल. त्यानंतर आलेला कोणताही अर्ज विचारात घेतला जाणार नाही. अनुज्ञेय वेळ संपल्यानंतर निविदेसंदर्भात काही तक्रार करावयाची असल्यास १५ दिवसांच्या आत तक्रार अर्जासोबत रु.५०,०००/-चा धनाकर्ष मा.मुख्य लेखा व वित्त अधिकारी, जिल्हा परिषद, सोलापूर यांचे नांवे सोलापूर येथे वटवीला जाणारा शुल्क म्हणून जिल्हा परिषदेस जमा करावा लागेल. तक्रारदाराचे म्हणणेत तथ्य आहे असे आढळून आल्यास सदर शुल्क परत करणेत येईल अथवा सदर शुल्क जप्त करणेत येईल.

२६) निविदेतील अटी व शर्तीनुसार आवश्यक कागदपत्रे या बाबतची निविदा समितीची खात्री पटल्यानंतरच संबंधित निविदाधारकाचा व्यापारी (दराचा) लिफाफा उघडण्यात येईल.

२७) इच्छुक निविदाधारकांनी पुढील प्रमाणे कागदपत्रे / बाबींची पूर्तता करणे आवश्यक आहे. सदर कागपत्रे पीडीएफ फॉरमॅटमध्ये स्कॅन करून वेबसाईटवर ऑनलाईनरित्या जिल्हा परिषदेस सादर करणे बंधनकारक आहे. सदर तांत्रिक लिफाफ्यातील कागदपत्रांच्या आर्हतेत आणि नमुना प्रयोगशाळा तपासणीमध्ये पात्र असणाऱ्या निविदाधारकांचे व्यापारी लिफाफे उघडण्यात येतील.

**मुख्य कार्यकारी अधिकारी**
**जिल्हा परिषद, सोलापूर**

Scanned with OKEN Scanner

## तांत्रिक लिफाफ्यासोबत सादर करावयाची कागदपत्रे (Technical Envelope)

१) निविदेतील अटी व शर्ती मान्यतेबाबतचे हमीपत्र (रु.१००/-च्या स्टँप पेपरवर).
२) निविदाधारकाचे वैध फर्म नोंदणी प्रमाणपत्र.
३) निविदाधारकाचे जीएसटी नोंदणी प्रमाणपत्र.
४) निविदाधारक हे उत्पादकाचे अधिकृत विक्रेते असल्यास अधिकृत विक्रेते असल्याबाबत उत्पादकाचे प्राधिकार पत्र.
५) निविदाधारक / उत्पादक हा राष्ट्रीय शैक्षणिक अनुसंधान आणि प्रशिक्षण परिषद (NCERT), नवी दिल्ली यांच्याकडील नोंदणीकृत असल्याचे (Empannel) वर असल्याबाबतचे प्रमाणपत्र.
६) निविदाधारक व उत्पादक यांचे वैध आयएसओ प्रमाणपत्र.
७) निविदाधारक व उत्पादक मागील ३ वर्षापासून व्यवसाय करत असल्याबाबतचा पुरावा म्हणून मागील तीन वर्षांचे व्यवसाय कर / आयकर विवरणपत्र(Acknowledgement Copy)भरणा केल्याच्या प्रती सादर करणे आवश्यक राहील.
८) दिनांक ३१/०३/२०२४ पर्यंतचे वस्तु व सेवा कर विवरणपत्र भरणा केल्याची प्रत सादर करण्यात यावी.
९) पॅन कार्डची प्रत.
१०) संपूर्ण भरलेला निविदा अर्जाची मूळ प्रत.
११) निविदाधारकाचे निविदेतील साहित्याचे एक वर्षाची वॉरंटीबाबतचे हमीपत्र (रु.१००/-च्या स्टँप पेपरवर)
१२) निविदाधारकाने शासनाच्या कोणत्याही विभागाच्या काळ्या यादीत समाविष्ट नसल्याचे रु.१००/- च्या स्टँप पेपरवर शपथपत्र सादर करावे.
१३) निविदाधारकाने नमुना तपासणी फी चे धनाकर्ष विहित वेळेत शिक्षण विभाग, जिल्हा परिषद, सोलापूर येथे सादर केल्याची पोहोच पावती.

### व्यापारी लिफाफा

१) निविदेसोबत दिलेल्या BOQ File मध्ये दर भरणे निविदाधारकांना अनिवार्य आहे.
२) सदर BOQ File मध्ये कोणत्याही प्रकारचा बदल करू नये. निविदाधारकाने दर भरत असतांना, दरांमध्ये सर्व करांचा (जी.एस.टी., आयकर इत्यादी सर्व शासकीय कर) आणि वाहतुक खर्चाचा समावेश करून दर भरणे आवश्यक आहे.
३) निविधारकाने वस्तुंचा, संख्येचा व विनिर्देशाचा विचार करून दर सादर करावेत.
४) सदर दर BOQ File मध्ये भरून ऑनलाईन रित्या अपलोड करणे निविदाधारकांना बंधनकारक आहे.

| अ.क्र. | साहित्याचे नांव | दर प्रती नग (सर्व करासह) |
|---|---|---|
| १ | Science Technology & Innovation Center | |

मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद, सोलापूर

Scanned with OKEN Scanner